# अनुसंधान

समर्थांच्या दासबोधाने कालसत्तेचे अपहरण केले आहे. कालसत्तेचे अपहरण केले असे म्हणण्याचे कारण समर्थांच्या समाधीनंतरही शतके उलटली तरीही दासबोधातील अक्षरांचा ताजेपणा, टवटवीतपणा, चिरंतनत्व, दासबोध ऐकणाऱ्याच्या व वाचणाऱ्याच्या प्रत्ययाला येत असते. दासबोधातील विलक्षण सम्यक् व सुंदर विचारधारा मनुष्याच्या वृत्तिप्रवाहाला दिव्यत्वाची विलक्षण प्रेरणा देऊन केवळ थांबत नाहीत तर नेमका प्रवास निश्चित करते. खरे पाहता दासबोध हा आत्मविद् होण्यासाठी सदैव उपयोगी पडणारा व मार्गदर्शक ठरणारा ग्रंथ आहे. समर्थांचा शाश्वत अक्षरावतार म्हणजेच दासबोध होय. जीवाची सर्व बंधने नाहीशी करणारा, आपल्या ज्ञानसत्तेचे त्याच्यात परिवर्तन घडवून आणणारा, जीवाला कोठे कोठे वेदना होतात हे नेमकेपणाने हुडकून काढून त्याला भवरोगरसायन ठरणारा, त्याच्यात चिंतन प्रवृत्ती निर्माण करून चिंतामुक्त करणारा, श्रीरामाचे अवतरण त्याच्या आत्म्यात करून त्याला आत्मारामाची प्रचिती देणारा, वेद, पुराणे, तत्त्वज्ञाने या सर्वांचे मथित नेमकेपणाने सांगून लोकव्यवहार सांभाळत सांभाळत आत्मतल्लीन होऊन आत्मारामी कसे स्थिर व्हावे हे शिकविणारा, भक्तिमार्ग संतुलित राखण्यासाठी मदत करणारा, सर्व प्रकारचे योग चिंतनशीलतेतून पचवून योगमार्गालाही ज्ञानदीपवत् असणारा दासबोध म्हणजे समर्थांचे हृदयच आहे. दासबोध सांगत असताना समर्थ स्वत: आत्मस्थितीच्या निश्चयातच होते. या निश्चयातून त्यांनी जी परमसत्ये प्रकट केली, त्या सत्यांचा विचार करावयाचा म्हटले तर मूलभूत सत्यनामक स्थिती

व या स्थितीत राहून अनुभवावयाचा साक्षेप हा जणू समर्थांचा स्वभावच झालेला होता. स्वभावातून स्वाभाविकतेची निर्मिती होत असते. प्रसन्नता, प्रभावीपणा, आश्वासकता, जरूर तेथे अवखळपणा, बलदंडपणा, यथोचित अक्षरविलास, प्रभुप्रेमासाठी अत्यावश्यक असलेली आर्तता, व्याकुळता, वेदांतावरही सहज सुलभ विवरण, आपल्या उपास्य दैवताच्या बाबतीत आवश्यक असलेली तन्मयता, या तन्मयतेतून साध्य करून घ्यावयाची चिन्मयता, चिद्विग्रहासाठी आवश्यक असलेला आग्रह, उपासनेसाठी आवश्यक असणारा अट्टहास, सत्य व असत्याचे विश्लेषण, ब्रह्ममाया विवरण, या सर्व गोष्टी दासबोध केवळ शिकवत नाही तर त्यांचे प्रबोधन करून समर्थ दासबोध वाचकाच्या अंतरंगात त्या आपल्या असीम कृपेने स्थिर करतात. दासबोधाचा मूळ उद्देश भगवद्भक्तीतून भगवंतमय होऊन जाणे हाच आहे. उपासनेविषयी समर्थ विशेष दक्ष आहेत. जगात प्रत्येक जीवाला प्रचितीस येणारा अस्थिरपणा मूळ अधिष्ठानसत्तेपासून बाजूला झाल्यानेच प्रचितीस येत असतो अशी समर्थांची धारणा आहे. ही त्यांची धारणा नेमकेपणाने जीवनाचे उद्दिष्ट काय हे जाणून घेण्यास प्रवृत्त करते. प्रवृत्ती, निवृत्ती व ज्ञान या त्रिमितीच्या पलीकडे जाऊन साक्षीत्व सिद्ध करण्यासाठी करावयास लावणारा बलदंड अट्टहास प्रयासाचा नाही तर तो आपल्या स्वभावात सहज मिसळून टाकून, ईश्वरप्रेममत्त होऊन, जगाला कंदूकवत कसे मानावे हे शिकवणारा ग्रंथ म्हणजे दासबोध होय. जीवाची बुद्धी वेगवेगळ्या पद्धतीने त्याला सुखावत व सतावत राहते. या बुद्धीला विवेकाचा अंकुश लावून रामनामाच्या कात्रीतून कसे नीट ठेवावयाचे व हरिनामोच्चार करत, दक्षतेने संतुलित आयुष्य कसे जगावयाचे, जीवनातला जीवनरस सत्यार्थाने कोठे आहे, याचे प्रबोधन करत असताना निर्द्वंद्व अवस्था उपभोगण्यासाठी उपासना हाच सत्य आश्रय आहे असे समर्थ म्हणतात. अंत:करण निर्वासन होण्यासाठी हृदय शुद्ध होऊन चित्तशुद्धी होण्यासाठी तसेच जीवनयात्रा सुफल आणि सफल होण्यासाठी दासबोधाच्या माध्यमातून समर्थ भक्तिबीजाचे रोपण करत असताना, 'भक्तिनेच योग देव। निश्चये पावती मानव।' असे आश्वासन देत असतात. हे आश्वासन म्हणजे केवळ दर्पोक्ती अथवा भ्रममूलक रचना नसून, समर्थांनी बहाल केलेला प्रचितीपूर्ण सिद्धांत आहे. या सिद्धांतावर यथोचित चिंतन घडावे, विचार व्हावा, विकल्प कोलमडून पडावेत, रामसत्तेचा आगळेपणा जाणवावा, तसेच अधर्ममूलक जे जे आहे त्याचा नाश व्हावा, उत्तम धारणा व्हावी, प्रगल्भतेतून प्रचितीही प्रगल्भ

होत जावी, भगवंताच्या माध्यमातून ज्ञानसत्ता अनुभूतीस यावी, विषयोपद्रव कमी व्हावा, त्रिपुटीचा लय व्हावा, भगवद्‌विषयक आस्था वाढीस लागावी, म्हणून समर्थांनी अती करुणामंगल होऊन दासबोधातील अक्षरे आत्मज्ञानाच्या पाकात मुरवून भवरोगरसायन म्हणून प्रकट केली आहेत. दासबोधरूपाने सर्वगत असलेले अप्रकट चैतन्य अक्षरमनोहर झाले आहे. दासबोध सांगायचा म्हणून सांगितला गेला नाही. लोककल्याणाची सहज स्फूर्ती हा संतांचा स्थायी भाव झालेला असतो. असे होण्याचे आध्यात्मिक कारण, साक्षात्कारी सिद्ध पुरुष हे चराचराशी समरस झालेले असतात. त्यांच्या देहात्म 'अहं'चे रूपांतर 'सोऽऽहं' मध्ये व सोऽऽहं प्रचितीतून सामरस्याच्या भावात झाल्याने चराचरविश्व हे माझेच हृदय आहे आणि या हृदयाकाशातून चिद्‌ब्रह्माचे सहज होणारे स्फुरण हा एक विश्वात्मकतेचा भाग असून जगात द्वैत नसून अद्वैतच आहे असा त्यांचा भाव झालेला असतो. खरे पाहता दासबोधासारख्या ग्रंथाचा विषय पारखून घेणे अवघड असते. निर्विषयत्व सिद्ध करण्यासाठी परमात्मविषयाच्या माध्यमातून अशा ग्रंथातील अक्षरे प्रकट होतात व ती अक्षरे प्रकट आणि अप्रकट चैतन्याचा जिव्हाळा लोकमानसाला लावण्यासाठी यशस्वी रीतीने आनंदमयतेला विलोभनीय करत करत आत्मसाक्षात्कार घडवून देण्यास मदत करतात. दासबोधातील सर्वच अक्षरांनी 'एक सत् विप्रा बहुदा वदंति।' या परमसत्याचाच उद्‌घोष केला आहे. दासबोध प्रकट करत असताना तो गुरुशिष्यांचा संवाद म्हणून समर्थांनी प्रकट केला असला तरीही देहबुद्धीने आत्मबुद्धीच्या केलेल्या अनुनयातून दासबोधातील अक्षरे परमविशुद्ध स्वरूपात लोकधारणेसाठी व आत्मवैभवसंपन्नतेसाठी प्रकट झाली आहेत असे म्हटले तर ज्यामुळे चैतन्यविग्रह होतो अशा विविध उपासना माध्यमांनाही ते मान्य होण्यास हरकत नसावी. समर्थांच्या अक्षरसामर्थ्याची प्रचिती दासबोधाकडे केवळ दृष्टिक्षेप टाकला तरीही आल्याशिवाय राहात नाही. आत्मचिंतनातून प्रज्वलित झालेली समर्थवाणी केवळ लोकांना पुनीत करते असे नाही तर प्रबोधनातून त्यांना भगवद्‌स्नान घडवून आणते व भगवंतमय होण्यास उपयोगी पडते. अत्यंत विषम काळात, असंतुलित सामाजिक अवस्थेत, विपरीततेने प्राप्त झालेल्या धर्मसंकट काळात 'आधी भगवद्‌कथा निरूपण।' असा उद्‌घोष करणारा दासबोध, जेव्हा दासबोधाचा अभ्यासक अथवा उपासक अभ्यासावयास लागतो तेव्हा त्याला असा निश्चित अनुभव आल्यावाचून राहात नाही की, ज्या अनुभवामध्ये चिरंतन मूल्यांचा बीजसंस्कार त्याच्या अंतरंगात

या ना त्या प्रकारे त्यास जागृत करत आहे व ही जागृतावस्था जीवनध्येयाशी सुसंगत होण्यासाठी व विपरीततेवर प्रहार करण्यासाठी आवश्यक आहे असेच वाटल्यावाचून राहणार नाही. समर्थांची 'स्व' तंत्र संस्कृती आहे व या संस्कृतीचा उद्देश आत्मशोध व वेध घेऊन सत्य 'स्व'चे उत्खनन करून त्यास जाणणे हा असून 'राम' हे या संस्कृतीचे माध्यम आहे. भगवद्‌भावातून संपन्न झालेली दासबोधातील अक्षरे कधी भाव संपन्न करतात तर कधी उपासनेतून प्रचितीला येणारी रहस्ये प्रकट करतात, कधी ज्ञानातील विज्ञान प्रकट करतात तर कधी आत्मसत्तेची जाणीव देतात, कधी अंतर्मुख करतात तर कधी व्यवहार विज्ञान प्रकट करतात. समर्थांचा कोदंडधारी 'श्रीराम' आगळा अशाचसाठी आहे की, सर्व वैविध्यात तोच आहे व त्याचीच सत्ता आहे हे सांगत असताना समर्थांचा आत्मदीप अत्यल्पही फडफडत नाही. दासबोधात तत्त्वाचाच विस्तार असल्याने दासबोधाचे तत्त्वज्ञान केवळ मृत्युंजयकारकच नाही तर अमृतदोहन करावयास शिकवणारे आहे. दासबोधातून प्रकट केल्या गेलेल्या संवेदना आत्मावस्थेशी निगडित असल्याने त्यास अक्षय रोचकता आहे तसेच अखंडत्वाची त्यात प्रचिती असल्याने महाशून्याचा वेध घेण्यासाठी अत्यावश्यक असणारा शक्तिपुरवठा करण्याची क्षमता आहे. आपले रामदास्य प्रकट करत असताना भक्तिवैभवासाठी आवश्यक असलेले आत्मबल पवनपुत्र हनुमंतासारखे ते प्रकट करतात. ब्रह्माचे खरे विवरण ब्रह्म झाल्याशिवाय करता येत नाही तसेच मायाविषयक ऊहापोह मायेच्या प्रचितीशिवाय करता येत नाही. मायाब्रह्माविषयक सरल सिद्धांत लोकांच्यासमोर मांडत असताना समर्थांचा साक्षेप जेव्हा अनुभवावयास मिळतो तेव्हा, श्रीरामची स्वये अवतरला समर्थरूपाने, असे वाटल्यावाचून राहात नाही. वाटणे आणि पटणे यात अंतर असते. वाटण्यात सहजता असली तरी पटण्यासाठी उपासनेतून अनुभूतीच घ्यावयास हवी. सर्वाभूती 'स्व'ला पाहणे ही समर्थांची अनुभूती असल्याकारणाने सज्जनगडचा हा सतेज संन्याशी आपल्या कुबडी, माळेसह जेव्हा कोट्यवधी लोकांच्या चित्तात प्रवेश करतो तेव्हा त्याचा हा प्रवेश जणू विश्वमंडळाला विभूषित करण्यासाठीच झाला आहे असे भावहृदयांना वाटल्याशिवाय राहात नाही. महाराष्ट्राच्या दरीकपाऱ्यातून, गिरीकंदरातून, रामनामाचे आकंठपान करून, आपल्या श्रीपद्म विभूषित चरणांनी दगडधोंडे आणि मातीही पावन करणारा हा लोकोत्तर महापुरुष जेव्हा केवळ आठवतो तेव्हा मनाला जणू असेच वाटत राहते की जणू साक्षात ज्ञानच आपल्या हृदयात

प्रवेश करत आहे. आत्मज्ञानाच्या शकटाची धुरा वेष्टून हा समर्थस्वामी जणू लोकोद्धारासाठी ज्ञानशकटाचे प्रचलन करत आहे असेच वाटत राहते. त्याने केलेले प्रचलन त्याच्याकडे आकर्षित होणाऱ्या प्रत्येकाच्या आत्म्याची आभा विशेष स्पष्ट करतेच करते व त्याचबरोबर आत्मविभूषित होण्यासाठी लोकांच्या अंत:करणामध्ये भावसमृद्ध, नवनवोन्मेष निर्माण करते. सज्जनगडीच्या या महाप्रभूचा लोकविलक्षण अवतार केवळ गडावरचे आकाशच निरभ्र करत नाही तर आपल्या आत्मज्ञानसूर्याच्या वत्सल किरणांनी कोट्यवधी भाविकांना हलकेच आत्मज्ञानाचे पांघरूण घालते. भावजागरण दासबोध करत असला तरीही त्यातून होणारे ज्ञानजागरण लोकांच्या हृदयाला भाव असा चिकटवते की तो वज्रलेपच होऊन जातो. श्रीरामाचा हा आगळावेगळा भक्त अध्यात्मक्षेत्रातील आपल्या अधिकाराबरोबर राष्ट्रजागरणासाठी जेव्हा प्रवृत्त होतो तेव्हा अज्ञान दृष्टीवर तो ज्ञानांजनाचा जणू उपचारच करीत आहे अशी प्रचिती यावयास लागते. उत्कट भव्य तेचि घ्यावे। मिळमिळीत अवघे टाकूनि द्यावे। या समर्थ रचनेमधून शून्याचाही वेध घेण्यासाठी आवश्यक असलेली आतुरता, उत्कटता अनुभवावयास मिळते. सर्वात सरस भगवंतच आहे असे समर्थांचे म्हणणे असून प्रपंच जरी निरस असला तरीही या सरसतेसाठी त्याचा वापर केल्यास कष्टी होण्याचे कारण पडणार नाही असे त्यांचे तत्त्वज्ञान आहे. दासबोधातील नमन मनुष्याला उन्मन करावयास लावणारे असून नमनातून नमनास योग्य कसे व्हावे हे शिकवणारे आहे. भावसंकलनासाठी सर्व स्तरावरून मार्गदर्शन करत असताना समर्थांचा वेगळा अभिनिवेष न जाणवता व तो देहात्म 'मी'शी संबंधित आहे असे न वाटता, त्यांची आत्मसत्ता श्रीरामाच्या माध्यमातून प्रकट होत आहे व वाचणाऱ्याला व ऐकणाऱ्याला ती बंधनमुक्त करत आहे अशी प्रचिती येते. भक्तिवैभवासाठी भावसंकलन हवे जसे दृढभाव निर्माण होण्यासाठी अनुसंधानही हवे असते व अनुसंधान नीट चालण्यासाठी आत कुठेतरी सुसूत्र अशी विचारसरणी तयार व्हावी लागते. समर्थांच्या प्रत्येक शब्दात प्रक्षिप्त तत्त्व जर कोणते असेल तर ते ''श्रीराम'' हेच तत्त्व आहे. दासबोधातील शब्दरचना जेव्हा अंतरात कार्यरत होते तेव्हा ती श्रीरामाच्या आठवणीसाठी व त्यातून राममय होण्यासाठी आहे असा भाव तयार व्हावयास लागतो. विशुद्ध प्रेम हा भक्तीचा पाया आहे. भावाचा अभाव रोखण्यासाठी व त्याचे रूपांतर भक्तीत होण्यासाठी विशुद्ध प्रेम निर्माण व्हावयास हवे, हे प्रेम निर्माण करण्याचे सामर्थ्य दासबोधातील अक्षरात